**॥ श्री ॥**
**॥ बाबा ॥**

## प्रदक्षिणा

धन्य धन्य हो प्रदक्षिणा गजानन बाबांची

झाली त्वरा सुरवरा विमान उतरायाची
हृदयाच्या पालखीत बसवूनी बाबांना ऽऽ
मनरूपी दांडे उचलूनी घेऊ खांद्याला ऽऽ
धन्य धन्य हो प्रदक्षिणा गजानन बाबांची ॥धृ.॥

टाळ मृदुंग केला हो रामनामाचा
बाबानंद होई नाम संकीर्तनाचा ऽऽऽ ॥धृ. ॥

प्रदक्षिणा करूनी देहबुध्दी वाहिली
श्रीकृष्णात्मक विठ्ठल रूखमाई पाहिली ऽऽ ॥धृ.॥

★★★★★